# Greenlawns School, Worli

**वार्षिक परीक्षा द्‌वितीय सत्र (२०२५-२०२६)**

**मराठी**

**इयत्ता:-सातवी** **पूर्णांक:- ८०**

**दिनांक:- २४.०२.२०२६** **वेळ –२ तास**

**सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.**

**शुद्‌ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.**

---

**प्र. १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-.** **(१०)**

**१.वरळी सी- फेस वर एक तास**

**२.खरा मित्र**

**३. अभ्यासाचे महत्त्व**

**प्र. २) खालील मुद्द्‌यांच्या आधारे गोष्ट तयार करून शीर्षक द्‌या :-** **(७)**

**मुद्‌दे - दोन मांजरे----- आनंदात उड्‌या मारणे —------------ त्यांना प्रश्न पडणे—-----------
लोण्याचा सारखी वाटणी करणे —------------ माकडाने गंमत बघणे —-------------- माकडाने विनंती करणे —---------- माकड मदतीस तयार होणे-—----------वाटणी करतांना लोणी खाणे —------------
मांजरांचे निराश होणे – तात्पर्य.**

**प्र. ३) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**आपला देश गुलामीमध्ये असताना ब्रिटिश सरकारविरूध्द प्रखर आणि तीव्र स्वातंत्र्यलढा लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी उभारला होता. त्यांचे खरे नाव केशव गंगाधर टिळक होते आणि लोकमान्य ही पदवी लोकांनीच दिली होती. त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले जायचे. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्‌ध हक्क आहे आणि ते मी मिळवणारच", अशी प्रतिज्ञा त्यांनी केली होती.**

**रत्नागिरीमध्ये जन्म झाल्यानंतर त्यांनी पुणे येथे महाविदयालयीन शिक्षण घेतले. तब्येत उत्तम रहावी, यासाठी भरपूर व्यायाम करण्यासाठी ते एक वर्ष महाविदयालयात गेले नाहीत. पदवी मिळाल्यानंतर त्यांनी गोपाळ गणेश आगरकर, महादेव नामजोशी, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्याबरोबर डेक्कन एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली. न्यू इंग्लीश स्कूल ही शाळा आणि फर्ग्युसन महाविदयालय**

त्यांनी सुरू केले. तेथे ते गणित शिकवत असत. जातीपातीने दुभंगलेला समाज एकत्र आणण्यासाठी त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हाच उत्सव आज महाराष्ट्रातील सर्वात मोठा सण आहे.

**प्रश्न :**

**१. टिळकांचे खरे नाव काय होते? यांचा जन्म कोठे झाला? (२)**

**२. टिळकांना काय म्हटले जायचे व का? (२)**

**३. त्यांनी कोणती प्रतिज्ञा केली होती ? ते कोठे गणित शिकवत होते? (२)**

**४. त्यांनी कशाची स्थापना केली आणि कोणाबरोबर केली? (२)**

**५. वाक्य बनवा :- व्यायाम, गणेशोत्सव. (२)**

## व्याकरण - विभाग

**प्रश्न ४) अ) समानार्थी शब्द लिहा :- (२)**

**१. संप्रदाय- २. श्रम-**

**आ ) विरुद्धार्थी शब्द लिहा :-. (२)**

**१. कौटुंबिक २. अवघड**

**इ) लिंग बदला :- (२)**

**१. वृद्ध - २. कलावंत -**

**ई ) वचन बदला :- (२)**

**१. शिकवणी- २. हात-**

**उ) खालील वाक्प्रचारांचे अर्थ लिहा.. (२)**

**१. दुर्लक्ष करणे**
**२. पोट भरणे**

ऊ) खालील वाक्यात क्रियापद ओळखा :- (१)

१. केशव झाडाखाली बसला होता.

ए) खालील वाक्यात विशेषण ओळखा :- (२)

१.तो लांब पाईप गोपाळने ओढत आणला होता.

२.कर्णागड नावाचा एक पौराणिक गड आहे.

<u>साहित्य – विभाग ( अंक – ४० )</u>

प्र. ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (१२)

१) अभ्यारण्यातून फिरताना विद्यार्थ्यांना माळढोक पक्ष्याबद्दल सरांनी काय सांगितले ?

२) गाईवासर घेऊन आलेल्या गुराख्याला गहिवरून का आले ?

३) श्यामला चालण्याचे श्रम का वाटत नव्हते ?

४) लहान भावाला आईने कसे समजावले?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (२)

१. आईन श्यामला कातर स्वरात काय विचारले ?

२. गोपाळचा कोणता गुण तुम्हाला आवडला ?

इ) खालील प्रश्नांची एक ते दोन शब्दांत उत्तरे लिहा :- (२)

१) माळढोक पक्षी कोणाचा मित्र आहे

२) पक्ष्यांचे फोटो काढण्यापूर्वी कोणाची परवानगी लागते?

ई) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (३)

i. नवीनच पाऊस जेव्हा सुरु होतो, तेव्हा मातीचा एक रम्य सुंदर ------- सुटत असतो.

ii. पक्षी हा संतुलित ---------- अविभाज्य घटक आहे

iii. मे महिन्याची सुट्टी संपून मी परत ----------- शिकावयास गेलो.

उ) कोण - कोणास म्हणाले :- (३)

१."त्या दिवशी एक बाई वाहून गेली हो त्यातून. "

२."आता माझी पेंसिल हरवणार नाही.

३." मी कर्ज काढले नाही, चोरलेही नाहीत, फीचेही खर्चिले नाहीत.

ऊ) शब्दार्थ लिहा :- (३)

१. पहऱ्या -

a. ओदा b. ओढा c. औद d. ओडा

२. रोजगारी होणे -

a. काम न करणे b. काम धंद्याला लागणे c. कामात मग्न असणे d. काम लवकर पूर्ण करणे

३. परेतनंच -

a. पुरातन b. प्रयत्न c. प्राय d. प्रायत्न

<u>कविता – विभाग</u>

प्र. ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:-

१. कवितेत खुळे कोणाला म्हटले आहे? (३)

२. कवयित्रीने लेकीला बोलकी चिमणी का म्हटले आहे? (२)

३. 'टप टप पडती ' या कवितेच्या कविचे नाव लिहा ? (१)

आ ) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा:- (४)

कुरणावरती ---------------------

-----------------------------

----------------------------

----------------------------- झुले !

ई) खालील दिलेल्या शब्दांचे यमक जुळणारे शब्द लिहा:- (२)

१. उरास- २. बसते -

उ)योग्य शब्दार्थ निवडून लिहा :-. (३)

१. भरारा -

a. तारा b.भरभर c.वारा d.तालावर

२. खुळे -

a.गाणे b.वेडे c.पेडे d.वेढे

**३. झोपाळा -**

**a. झौका   b.झोका   c.झोखा   d.झोक**

**----------------×समाप्त ×----------------**